# मिरा भाईंदर महानगरपालिका

**अतिरीक्त आयुक्त यांचे दालन**

स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828


दि.१९/०३/२०२५

जा.क्र.मनपा/अआ-।/।२।/२०२४-२५

## // कार्यालयीन आदेश //

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये निविदा मागविण्यापुर्वी निविदा पात्रतेच्या अटी निविदा परिक्षण समितीकडून विभागामार्फत तपासून घेण्यात येतात. निविदा परिक्षण समितीच्या असे निर्दशनास आले आहे की, विभागामार्फत करावयाच्या कामाबाबत एकदा निविदा परिक्षण समितीने अटी तपासून दिल्यावर पुन्हा पुन्हा प्रत्येक कामासाठीच्या निविदा पात्रतेच्या अटी तपासणीसाठी पाठविण्यात येत आहेत. वास्तविक पाहता निविदा पात्रता अटी या शासनाच्या उद्योग ऊर्जा कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार व केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयांतर्गत Department of Expenditure यांनी CVC शी चर्चा करुन अंतिम केलेलया Booklet मधील अटी तपासून विभागाने पात्रतेच्या व इतर अटी तयार करणे बंधनकारक आहे.

तथापि महानगरपालिकेने एकवाक्यता रहावी यासाठी मा. आयुक्त यांनी निविदा परिक्षण समितीकडून पात्रतेच्या अटी तपासून घेण्याबाबत सूचित केले होते. त्यामुळे निविदा मागविताना निविदा पात्रतेच्या व इतर अटी नियमानुसार व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन आदेशानुसार ठरविण्याची संपूर्ण जबाबदारी ही विभागाची आहे. निविदा परिक्षण समिती ही मार्गदर्शक म्हणून काम पहात असते. त्यामुळे सर्व विभागांनी एका प्रकारच्या कामासाठी ठरविण्यात आलेल्या पात्रतेच्या अटी एकदा तपासून घेतल्यावर त्या विभागाने त्याच प्रकारच्या कामाच्या निविदा मागविताना पुन्हा निविदा परिक्षण समितीकडे तपासणीसाठी प्रस्ताव पाठवू नयेत असे केल्याने एकाच प्रकारच्या कामासाठी अनावधनाने वेगवेगळ्या अटी निश्चित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सर्व विभागांना सूचित करण्यात येते की, यापुढे एकाच प्रकारच्या निविदासाठी विभागाने शिफारस केलेल्या निविदा पात्रता अटी निविदा परिक्षण समितीने तपासून दिल्यावर त्याच प्रकारच्या कामासाठी पुन्हा असे प्रस्ताव सादर करू नयेत. तसेच निविदा अटी तपासणीची प्राथमिक जबाबदारी ही प्रथम काम करणाऱ्या विभागाची असल्याने कायदेशीर आदेश, शासन आदेश तपासून पात्रतेच्या अटी समितीपुढे सादर कराव्यात. हेतूपुरस्पर काही अटी कमी जास्त करुन समितीच्या निदर्शनास आणल्यास संबंधीत विभाग त्यास जबाबदार असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अतिरीक्त आयुक्त तथा**
**अध्यक्ष, निविदा परिक्षण समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत कार्यवाहीसाठी :-**

१) **सर्व उपायुक्त / शहर अभियंता**
२) **सर्व विभागप्रमुख**

**प्रत माहितीसाठी :-**

**मा. आयुक्त तथा प्रशासक,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**